# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई :४००००१.

दूरध्वनी- २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०,/५१ फॅक्स नं.२६९२१०२

तार- EDUTECH E_mail desk7@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


अत्यंत तातडीचे

क्रमांक : ७/तंशिसं/अनुदान/वेतन अग्रिम/प्रमाणपत्र/२००८-०९/७१९

दिनाक : 5 NOV 2008

प्रति,

१. संचालक / प्राचार्य,
अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतने
व तत्सम पदवी/पदविका संस्था

२. कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड ४०२ १०३

३. प्राचार्य,
सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,
मुंबई

विषय : प्रमाणपत्र देणेबाबत

संदर्भ : महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेपुर-१२०८/प्र.क्र.७२/सेवा-९, दि.०६.१०.०८

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्रीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत केंद्र शासनाने सुधारणा केलेली आहे. त्या वेतनश्रेणीचे परीक्षण करुन राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे शासनाच्या विचाराधीन आहे. सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यापूर्वी विद्यमान वेतनश्रेणीत काही रक्कम अग्रीम म्हणून , जे कर्मचारी दि.०१.०४.०८ रोजी नियमित वेतनश्रेणीत वेतन घेत होते व दि.०१.१०.०८ रोजी शासन सेवेत कार्यरत आहेत अशा राज्यशासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना त्यांच्या दि.०१.१०.०८ रोजी अनुज्ञेय असलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रु.१०,०००/- यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अदा करण्यास उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये मंजूरी दिली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अधीन राहून राज्यातील अशासकीय अनुदानित संस्थांकडून पात्र असलेल्या कर्मचा-यांची माहिती मागविण्यात आली होती. माहितीच्या अनुषंगाने मंजूरी आदेश काढून देयके पारीत करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे सादर करण्यात आली आहेत. देयके पारीत करण्यास आक्षेप घेऊन (तोंडी) संस्थेने पात्र असलेले अधिकारी / कर्मचारी निलंबित नसून, दीर्घ मुदतीच्या असाधारण रजेवर नसल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याकरीता कळविलेले आहे.

तरी याद्वारे आपणांस सूचित करण्यात येते की, आपण सादर केलेल्या, पात्र असलेल्या कर्मचा-यांच्या यादीतील कोणताही अधिकारी / कर्मचारी निलंबीत नसून, दीर्घ मुदतीच्या असाधारण रजेवर नसल्याचे प्रमाणपत्र त्वरीत या संचालनालयास सादर करावे.

(डॉ.सु.का.महाजन)
प्र/संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

D:\gauri\CIRCULAR.doc